# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २०/१०/२०२४ (रविवार) सायंकाळ**

---

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. खापरखेडा** :— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन खापरखेडा येथे अप क्र. ३४९/२१ कलम ३७६ भांदवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दि. ०६/०८/२०२१ रोजी नागपुर मेयो पोलीस बुथ वरून सुचना पत्र प्राप्त झाल्यावर पिडीता मुक बधीर मुलगी हिचे मुक बधीर विद्यालय नागपुर येथील शिक्षीका यानी पिडीता मुलीची आई समक्ष त्यांचे सांकेतीक भाषेतून विचारपुस करून बयान नोदविले असता हिचे सोबत **आरोपी नामे— किशोर बापुराव मेश्राम, वय ३६ वर्ष, रा. वार्ड क्र. ३, वारेगाव खापरखेडा** याने तिला मोसावर बसवुन कुठेतरी ठिकान घेवून जावून तिच्यावर बलात्कार /सभोग केल्याचे व त्याचे पासून पिडीता ही गर्भवती असल्याचे सांकेतीक भाषेदवारे सांगत आहे तरी तिवे प्रश्नोत्तर स्वरूपात बयान घेन्यात आले तसेच पिडीताची फिर्यादी आई याच्या बयानात सांगतात की वेदयकीय अधिकारी यानी पिडीता ही ०७ महिन्याची गर्भवती असल्याचे सांगीतले व तसेच पिडीताचे फिर्यादी आईचे बयान व पिडीताचे प्रश्नोत्तरी स्वरूपात घेन्यात आलेल्या बयानावरून गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणाचे तपास सपोनि लक्ष्मी मलकुलवार यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. न्यायालयात दाखल केले होते. सदर प्रकरणात मा. डी जे ११ नागुर मॅडम यांनी दिनांक १९/१०/२०२४ रोजी वरील नमुद आरोपीस कलम ३७६ भांदवि मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व १०,०००/—रू दंड, दंड न भरल्यास ०६ महिने साधी कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी सायखेडकर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोहवा सचिन चौधरी पोस्टे खापरखेडा यांनी मदत केली आहे.

# कळमेश्वर येथील जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पोलीस स्टेशन कळमेश्वर गुन्हे रजि.नं ८७९/२०२४ कलम ३०४(२), ३(५) भा.न्या.स. गुन्हयाचा समांतर तपास करण्याबाबत मा. पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, यांनी आदेशीत केल्याने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांनी पोलीस अधिकारी व अमलदार यांचे विशेष पथक तयार केले व गुन्हयातील अनोळखी आरोपीचा शोध घेण्यास सुरूवात केली. सदर गुन्हयाचा समांतर तपासामध्ये फिर्यादी व साक्षीदाराकडून प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीच शोध घेणे सुरू असताना गोपनीय माहिती मिळाली की गुन्ह्यातील आरोपी हे कपिल नगर भागातील आहेत माहितीवरून शोध घेत असता आरोपी १) निलेश उर्फ अभी राजू कडबे वय २७ वर्षे, रा. समता नगर. नागपूर हा संशयितरित्या मिळून आल्याने त्यास विचारपूस केली असता त्याने त्याचा साथीदार आरोपी व २)उस्मान अकबर खान २० वर्ष रा.कपिल नगर नागपूर याचे सह मिळुन गुन्हा केल्याचे व गुन्ह्यातील हिसकावलेले सोन्याचे मंगळसूत्र आरोपी क्रमांक एकचा साथीदार ३)पाहिजे आरोपी फैजान अन्सारी रा.टिमकी, मोमीनपुरा नागपूर यास विकले बाबत माहिती उघड केल्याने व गुन्ह्यात वापरलेली ॲक्टिवा होंडा मोटरसायकल त्याचे ओळखीचे इसमास विकल्याचे माहितीवरून आरोपी क्रं. २ जवळून १. चाळीस हजार रुपये नगदी २. एक विवो मोबाईल १०,०००/रू ३. एक होंडा ड्रू मॉपेड कि.१००,००० तसेच ४. साक्षीदार याचे जवळ असलेली गुण्यात वापरलेली एक्टिवा होंडा मोपेड कि. १००,०००रू असा एकूण २५००००रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीत ०२ इसमांना गुन्ह्याचे पुढील तपासात पो. स्टे. कळमेश्वर येथे मुद्देमालासह हस्तातरिंत करण्यात आलेले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, स.पो.नी.किशोर शेरकी, स.पो.नी.मनोज गदादे, स.पो.नी.जीवन राजगुरू, स.पो.नी.आशिष ठाकूर, स.पो.नी.सागर गोमासे, पो.उप. नि. बत्तूलाल पांडे, पो.हवा.संजय बांते, पो.हवा.इक्बाल शेख, पो.हवा.प्रमोद भोयर, मपोहवा नीतू रामटेके, पो. ना. संजय बरोदीया, पो.ना.सतीश राठोड,सायबर सेल, चा.पो.हवा. राहुल पाटील, चापो.हवा. आशुतोष लांजेवार, पोलीस नायक सुमित व इतर स्टाफ यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर